# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ३०** **// तहकूब स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त //** **दिनांक १५/०२/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१५/०२/२०१९ शनिवार रोजी दुपारी ०४.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती अड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या तहकूब स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. अड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| |
|---|
| खडके सुनिल वामनराव |
| सनकत चेतन गणेश |
| काळे रेश्मा कुंदन |
| शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस, उपायुक्त,श्री.अजित मुठे, उपायुक्त,श्री.मिनीनाथ दंडवते, मुख्य लेखापरिक्षक,श्री.संतोष वाहुळे, मुख्य लेखालेधिकारी, श्री.कपिल पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील, श्री.सु.आ.डोईफोडे, शहर अभियंता, श्री.सुनिल भोळे उपस्थित होते.

* वंदे मातरमने सभेला सुरुवात करणेत आली.

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सभेला सुरुवात करणेत येत आहे.

**नगरसचिव:- विषय क्र. १)** दि.३१/०१/२०२० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.सुनिल खडके :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.३१/०१/२०२० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ०५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** जळगांव शहर महानगरपालिका मालकीची जागा केशवस्मृती प्रतिष्ठान व जुनी सरस्वती डेअरी, नवीपेठ या दोन इमारतींमधील जागा पार्किंगसाठी स्वखर्चाने केशवस्मृती प्रतिष्ठान यांना विकसीत करण्यास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका मालकीची नवीपेठ सरस्वती डेअरीचे पूर्वेस असलेल्या दोन इमारतीमधील जागेवर असलेले अतिक्रमण, झाडे, घाण साफ करण्यात आलेली असुन त्याठिकाणी नव्याने अतिक्रमण होवू नये म्हणून तसेच सदरची जागा ही सर्वीस लॅन म्हणुन असल्याने त्याठिकाणी सार्वजनिक पार्कींग करीता वापरणे योग्य असल्याने त्याठिकाणी मुरुम टाकुन पेव्हींग ब्लॉक बसविणे चे काम केशवस्मृती प्रतिष्ठान स्वखर्चाने बसवण्यास तयार असल्याने त्यांना सदरचे काम स्वखर्चाने करण्यास विनाअटीशर्ती विकसित करणेस व सदरची जागा त्यांना पार्कींग करणे करीता देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशानुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ०५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** सन २०१९-२० या आर्थिक वर्षा करीता मासिक जी.एस.टी.चलन व वार्षीक विवरण पत्र भरणे कामी स्थानिक कर सल्लागार नियुक्तीस मंजुरी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**मा.सभापती :-** प्रशासनाने या विषयाचे जे डॉकेट दिलेले आहे ते मोघम स्वरुपाचे आहे तरी प्रशासनाने याबाबत सविस्तर माहिती सभागृहाला दयावी.

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** महानगरपालिकेतुन अदा होणाऱ्या मक्तेदार / पुरवठादार यांचे देयका मधुन कपात केलेले जी.एस.टी. टी.डी.एस. दरमहा चलन तयार करुन भरणा करणे व वार्षीक विवरण पत्र भरणे कामी दर मागविणेत आले होते. सदर कामी श्री.ए.आर.शहा अण्ड असोसिएट यांचे सर्वात कमीचे दर आलेले आहेत त्यांची नियुक्ती करीत आहोत.

**सौ.रेश्मा काळे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, शासनाच्या आदेशान्वये महानगरपालिकेतुन अदा होणाऱ्या मक्तेदार / पुरवठादार यांचे देयका मधुन कपात केलेले जी.एस.टी. टी.डी.एस. दरमहा चलन तयार करुन भरणा करणे व वार्षीक विवरण पत्र भरणे कामी श्री.ए.आर.शहा अण्ड असोसिएट यांची सन २०१९-२० या आर्थिक वर्षा करीता सर्वात कमी आलेले दर रक्कम रु.२,५१,८१२/- मात्र स्विकृत करणेस व श्री.ए.आर.शहा अण्ड असोसिएट यांची सनदी लेखापाल म्हणुन नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशानुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ०५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** जलशुध्दीकरण केंद्र येथील ४० एचपी ब्लोअर कॉम्प्रेसर मे.वैष्णवी एन्टरप्राईजेस,औरंगाबाद येथून दुरुस्ती करणे कामी रक्कम रु.१,५८,६८६/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.रेश्मा काळे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, पा.पु.विभागा कडील मशिनरी विभागा अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र येथे पाणी शुध्दीकरण प्रक्रिया प्लॉन्ट अंतर्गत रेतीचे ६ बेड आहेत. सदर बेड दैनंदिन एअर ब्लोअर मोटार कॉम्प्रेसरव्दारे हवा देऊन बेड मधील Unwanted partical, घाण शेवाळ इ. पाण्याचा प्रेशर देऊन बाहेर काढले जातात. सदर प्रक्रिया ही दैनंदिन करावी लागते. त्याकामी दोन एअर कॉम्प्रेसर ४० एचपीचे बसविणेत आले आहे. त्यापैकी एक पंप स्टॅण्ड बाय ब्लोअर नादुरुस्त झालेला आहे. दुरुस्तीकामी शहरात

चौकशी केली असता कोणीही कुशल एजन्सी नाही. करीता एअर ब्लोअर कॉम्प्रेसर हे औरंगाबाद येथे वैष्णवी एन्टरप्राईजेस, एमआयडीसी वाळुज, बजाज नगर येथे पाठविणेत आले आहे.

मे.वैष्णवी एन्टरप्राईजेस,औरंगाबाद यांनी सदर एअर ब्लोअर उघडून दुरुस्तीबाबत व नव्याने लागणारे स्पेअर पार्ट बसवून ट्रायल देणेसह रुपये १,५८,६८६/- जीएसटी करासह दरपत्रक सादर केले आहे. पाणी शध्दीकरण प्रक्रियेमध्ये व्यत्यय येवू नये म्हणून ४० एचपीचे एअर ब्लोअर कॉम्प्रेसर तातडीने दुरुस्त होणे आवश्यक असल्याने विना निविदा धनादेशाव्दारे दुरुस्तीचे काम करणेकामी अधिकृत दुरुस्तीधारक / सर्व्हीस एजन्सी मे.वैष्णवी एन्टरप्राईजेस, एमआयडीसी वाळुज बजाजनगर, औरंगाबाद यांनी दिलेल्या प्रोफार्मा इनव्हाईस नुसार रक्कम रु.१,५८,६८६/- मात्रचा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील पाणी पुरवठा यंत्रसामुग्री व्यवस्था व दुरुस्ती या लेखा शिर्षकाखालील रक्कमेतून करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ०५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र.५ )** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०६/०१/२०२० ते दि.१०/०१/२०२० अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.चेतन सनकत:-** मुख्यलेखापरिक्षक विभागाकडील माहिती घेतली.

**श्री. सुनिल खडके :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०६/०१/२०२० ते दि.१०/०१/२०२० अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ०५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ६)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** आयुक्त साहेबांनी केलेल्या संविदाची माहिती घेतली

**श्री.चेतन सनकत :-** सदर प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./११३/दि.२२/०१/२०२० अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता ३० मॅट्रीक टन इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचेकडुन प्रति टन रक्कम रु.३७,०७४/- दर प्रमाणे एकुण रु.११,१२,२२०/- मात्र + वाहतुक खर्च रक्कम रु.८४,७८८/- असा एकुण रक्कम रु.११,९७,००८/- मात्र खर्चाची संविंदा.

२) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./१२८/दि.२४/०१/२०२० अन्वये नाविण्यपुर्ण योजना सन २०१९-२० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१२ मध्ये गट नं.४७१/अ१/२क/१+४७१/अ२/२ब मेहरुण येथे मुलिंसाठी अभ्यासीका बांधणे कामी मक्तेदार संदेश ज्ञानदेव टेकाडे यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९% कमीचे दरानुसार रक्कम रु.१४,८२,४०१/- मात्र खर्चाची संविंदा.

३) प्रशासकीय आदेश क्रं./विद्युत/३०/दि.२९/०१/२०२० अन्वये जळगांव शहरातील २१ चौकातील स्वयंचलित वाहतुक नियंत्रक देखभाल व दुरुस्ती कामाचा एक वर्षासाठी वार्षीक मक्ता (AMC) देणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेपेक्षा ०.३६% कमीचे दर, सिग्नल मोड करीता रक्कम रु.२७४०/- प्रती माह प्रती सिग्नल चौक तर ब्लिंकर मोड करीताचे दर हे रक्कम रु.२५८५/- प्रती माह प्रती सिग्नल चौक याप्रमाणे एका वर्षासाठी एकुण रक्कम रु.६,९०,४८०/- मात्र खर्चाची संविदा.

४) प्रशासकीय आदेश क्रं.सा.बां.११६/दि.२३/०१/२०२० अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०५ शिवाजी चौक ते ब्राम्हण सभा पर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार मे.पी.एस.कुमावत अन्ड कंपनी यांचे वाटाघाटी अंतीचे १८% जास्तीचे दरानुसार रक्कम रु.१३,३०,३२२/- मात्र खर्चाची संविदा.

५) प्रशासकीय आदेश क्रं.सा.बां.११७/दि.२३/०१/२०२० अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०५ प्रकाश मेडिकल पासुन ते शिवाजी चौकापर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार मे.पी.एस.कुमावत अन्ड कंपनी यांचे वाटाघाटी अंतीचे १८% जास्तीचे दरानुसार रक्कम रु.१७,८२,७२२/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ०५** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**